जिल्हा स्त्री रुग्णालय, धुळे येथील ६८ अस्थाई पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः पदआ - २०१८ /प्र.क्र.१४८ /आरोग्य-३

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: १७ मे,२०१८

वाचा -

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक -पदआ २०१७/प्र.क्र.२३८/आरोग्य -३, दिनांक- १५.०१.२०१८.**

२) **आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-३/टे-५अ/जिस्त्रीरु, धुळे/अपदे/१८-१९/४०१५-१६/१८, दिनांक-०८.०५.२०१८.**

शासन निर्णय-

उपरोक्त अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये उप संचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांच्या अधिपत्याखालील १०० खाटांचे स्त्री रुग्णालय, धुळे येथील ६८ अस्थाई पदांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

२. आता या शासन निर्णयान्वये सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार उप संचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांच्या अधिपत्याखालील १०० खाटांचे स्त्री रुग्णालय, धुळे येथील सदर ६८ अस्थाई पदांना दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक-आर-१

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०१ - नागरी आरोग्य सेवा - विषम चिकित्सा
११०-७ - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना
(०६)(०१) - मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये (२२१० ०२२६)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक,दिनांक- ०५.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१७११५४१३८२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.05.17 17:40:16 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवरसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक,आरोग्य सेवा (रुग्णालये- राज्यस्तर), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) पुणे.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक.
७. जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय, धुळे
८. जिल्हा कोषागार अधिकारी, धुळे.
९. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
११. निवडनस्ती (आरोग्य-३)

कार्यालयाचे नावः- स्त्री रुग्णालय (१०० खाटा), धुळे

अ.क्र.	पदनाम	वर्ग	एकुण पदे	स्थायी पदे	अस्थायी पदे
१	वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१	१	१	०	१
२	वैद्यकीय अधिकारी (स्त्री रोग व प्रसुती तज्ञ) वर्ग-१	१	१	०	१
३	वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ) वर्ग-१	१	१	०	१
४	वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ) वर्ग-१	१	१	०	१
५	वैद्यकीय अधिकारी (क्ष-किरण शास्त्रज्ञ) वर्ग-१	१	१	०	१
६	वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण शास्त्रज्ञ) वर्ग-२	२	२	०	२
७	वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ) वर्ग-२	२	२	०	२
८	वैद्यकीय अधिकारी (स्त्री रोग व प्रसुती तज्ञ) वर्ग-२	२	३	०	३
९	वैद्यकीय अधिकारी वर्ग-२	२	५	०	५
१०	सहाय्यक अधिसेविका वर्ग-३	३	१	०	१
११	प्रशासकीय अधिकारी वर्ग-२	२	१	०	१
१२	परिसेविका वर्ग-३	३	५	०	५
१३	बालरोग परिचारीका वर्ग-३	३	८	०	८
१४	आहार तज्ञ वर्ग-३	३	१	०	१
१५	अधिपरिचारीका वर्ग-३	३	२०	०	२०
१६	रक्तपेढी तंत्रज्ञ वर्ग-३	३	२	०	२
१७	क्ष-किरण तंत्रज्ञ वर्ग-३	३	२	०	२
१८	प्रयोगशाळा तंत्रज्ञ वर्ग-३	३	२	०	२
१९	ई.सी.जी तंत्रज्ञ वर्ग-३	३	१	०	१
२०	औषध निर्माण अधिकारी वर्ग-३	३	३	०	३
२१	प्रयोगशाळा सहाय्यक वर्ग-३	३	३	०	३
२२	कार्यालयीन अधिक्षक वर्ग-३	३	१	०	१
२३	वरिष्ठ लिपीक वर्ग-३	३	१	०	१
	एकुण वर्ग-१ ते वर्ग-३ पदे		६८	०	६८